केंद्र शासनाच्या सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध, व्यापार विनियमन आणि वाणिज्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण) कायदा २००३ आणि मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील तरतूदींची शासकीय आरोग्य संस्थामध्ये / कार्यालयामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः तंबाखू २०१४/प्र.क्र.१५९/आरोग्य-५,

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, नवीन मंत्रालय, मुंबई.
तारीख: १६ जुलै, २०१४.

वाचा :

१) मुंबई पोलीस अधिनियम, १९५१

२) केंद्र शासनाचा सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध, व्यापार विनियमन आणि वाणिज्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण) कायदा, २००३

३) राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता केंद्र शासनाच्या कार्यकारी मार्गदर्शक सूचना, २०१२.

४) अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६, क्र. एफएसएसए/अधिसूचना/७७७-२०१३/७, दिनांक १८ जुलै, २०१३.

**परिपत्रक :**

मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ११६ मधील तरतूदीनुसार सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर आणि धुम्रपानावर प्रतिबंध आहे. केंद्र शासनाच्या, सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध, व्यापार विनियमन आणि वाणिज्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण) कायदा, २००३ च्या कलम ४ मधील तरतूदीनुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानावर प्रतिबंध करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६, क्र.एफएसएसए/अधिसूचना/७७७-२०१३/७, दिनांक १८ जुलै, २०१३ अनुसार लोकांच्या आरोग्याच्या हितासाठी स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी यांची निर्मिती, साठवण, वितरण किंवा विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानावर आणि थुंकण्यावर, वरील अधिनियमान्वये प्रतिबंध असला तरी, आणि त्या माध्यमातून दंडात्मक कार्यवाही होत असली तरी, सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याचे आणि धुम्रपान करण्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसत नाही. थुंकण्यामुळे सार्वजनिक मालमत्ता विद्रुप होते. तसेच नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. क्षयरोग, स्वाईन फ्ल्यू, न्यूमोनिया यांसारख्या आजारांचा फैलाव थुंकीमार्फत होतो. केंद्र शासनाच्या सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम सन २०१२ च्या वार्षिक अहवालानुसार, देशातील ३ दशलक्ष लोक आणि त्यापैकी महाराष्ट्रातील ७५३१९ लोक क्षयरोगाने पिडीत आहेत. क्षयरोगांमुळे भारतातील ३ लक्ष लोक मृत्युमुखी पडले असून, त्यामध्ये महाराष्ट्रातील मृतांची संख्या ६६९२ इतकी आहे.

सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांमध्ये तंबाखू अथवा तंबाखूजन्य पदार्थ चघळल्यामुळे थुंकणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. ग्लोबल ॲडल्ट टोबॅको सर्व्हे इंडिया २००९-१० च्या सर्वेक्षणानुसार देशातील २५.९ % नागरिक (पुरुष ३२.९ % आणि स्त्रिया १८.४ %) धुररहित तंबाखूचे सेवन करतात. महाराष्ट्रातील धुररहित तंबाखूचे सेवन करणाऱ्या नागरिकांचे प्रमाण २७.९ % (पुरुष ३५.३ % आणि स्त्रिया १८.९ %) इतके आहे. तंबाखूजन्य पदार्थ अथवा पान चघळून थुंकल्यामुळे सार्वजनिक ठिकाणी भिंती लाल होऊन सार्वजनिक मालमत्ता विद्रुप होणे, विद्रुप झालेल्या भिंती पुन्हा पुन्हा रंगवण्यासाठी जनतेने कर रुपाने दिलेला पैसा खर्च करणे प्रशासनास भाग पडते.

तंबाखू सेवन करुन थुंकण्यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होतेच, पण त्यामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होऊन कर्करोग, श्वसनाचे आजार, पुनरुत्पादन संस्थेचे आजार, पचनसंस्थेचे आजारा यांसारख्या प्राणघातक आजारांची लागण होते. दरवर्षी जगातील सुमारे ६० दशलक्ष लोकांना मृत्यु तंबाखू सेवनामुळे होत असून, तंबाखू सेवन जगभरातील बऱ्याच आजारांचे आणि मृत्युचे कारण आहे. सन २०१० च्या पाहणी अहवालानुसार महाराष्ट्रातील सुमारे ३१.४ % लोकांचा मृत्यु तंबाखू अथवा तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यामुळे पसरणारे विविध आजार आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्युंची आकडेवारी विचारात घेता, मुंबई पोलीस अधिनियमातील कलम ११६ ची (सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास व धुम्रपानास प्रतिबंध) अंमलबजावणी प्रभाविपणे होणे आवश्यक वाटते. सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांमध्ये तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवन करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असल्याने, मुंबई पोलीस अधिनियमातील, थुंकण्यावर प्रतिबंध कलमाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्यांचे प्रमाण निश्चितपणे कमी होईल.

या सर्व बाबी विचारात घेऊन असे सूचित करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभागाची सर्व कार्यालये तसेच सार्वजनिक आरोग्य उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, संदर्भ सेवा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, क्षयरोग/कुष्ठरोग रुग्णालये इत्यादी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त सर्व आरोग्य संस्थांमध्ये मुंबई पोलीस अधिनियम कलम ११६ ची प्रभावी अंमलबजावणी करावी. राज्यातील आरोग्य विभागाच्या कार्यालयांमध्ये तसेच सर्व आरोग्य संस्थांमध्ये थुंकण्यास तसेच तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवन करण्यास मनाई आहे. अशा आशयाचे फलक कार्यालयाच्या /आरोग्य संस्थांच्या दर्शनी भागात लावावेत. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ सेवनाचे दुष्परिणामांची सचित्र माहिती दर्शविणारे पोस्टर्स देखील कार्यालयांमध्ये तसेच आरोग्य संस्थांमध्ये जागोजागी लावावेत. सार्वजनिक आरोग्य विभागाचे सर्व कार्यालय प्रमुख तसेच सर्व आरोग्य संस्थांचे प्रमुख यांनी सदर सूचनांची कटाक्षाने अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१४०७१६१२४७१३५६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saunik Sujata M

Digitally signed by Saunik Sujata M
DN: CN = Saunik Sujata M, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Dept
Date: 2014.07.16 13:02:40 +05'30'

**( सुजाता सौनिक )**
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.

प्रत,

१. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५. मा. मंत्री /मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. प्रधान सचिव /सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय यांचे स्वीय सहाय्यक,
७. धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त कार्यालय, वरळी, मुंबई.
८. अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)
९. उप संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१०. जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
११. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
१२. धर्मादास संस्था संचलित/खाजगी /रेड क्रॉस रक्तपेढया (सर्व)
१३.जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१४. निवडनस्ती (आरोग्य-५)